RNI No. MAHBIL /2009/36619

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग एक—कोकण विभागीय पुरवणी

वर्ष १२, अंक २८(४)] सोमवार, एप्रिल २७, २०२६/वैशाख ७, शके १९४८ [पृष्ठे ५, किंमत : रुपये ११.००

असाधारण क्रमांक ४३

**प्राधिकृत प्रकाशन**

### उपविभागीय अधिकारी राजापूर यांजकडून

**अधिसूचना**

**भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करतांना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३.**

क्रमांक उविअरा/भूसंपादन/एसआर-१०९/कुरंग/२०१५.—ज्याअर्थी, भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) याच्या कलम ३ च्या खंड (इ) च्या परंतुका द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करून काढण्यात आलेली शासकीय अधिसूचना, महसूल व वन विभाग क्र. संकिर्ण ११/२०१४/प्र.क्र. ७७/अ-२, दिनांक १९ जानेवारी, २०१५ (यात यापुढे जिचा निर्देश "उक्त अधिसूचना" असा करण्यात आला आहे.) याद्वारे असे अधिसूचीत केले आहे की उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (झेड अे) मध्ये व्याख्या केलेल्या एखाद्या सार्वजनिक प्रयोजनासाठी, एखाद्या जिल्ह्यातील ५०० हेक्टर पेक्षा अधिक नसेल इतक्या क्षेत्राकरिता जमीन संपादन करण्याच्या संबंधात, अशा जिल्ह्याचा जिल्हाधिकारी हा उक्त अधिनियमाच्या प्रयोजनासाठी समुचित शासन असल्याचे मानण्यात येईल.

आणि ज्याअर्थी, उक्त अधिसूचनेनुसार समुचित शासन असलेल्या रत्नागिरी जिल्हयाच्या जिल्हाधिकाऱ्यांस यासोबत जोडलेल्या अनुसूची एक मध्ये अधिक तपशिलवार वर्णन केलेली जमीन ( यात यापुढे जिचा निर्देश " उक्त जमीन" असा करण्यात आला आहे.) सार्वजनिक प्रयोजनासाठी ( यात यापुढे जिचा निर्देश "उक्त सार्वजनिक प्रयोजन" असा करण्यात आला आहे.) तीची आवश्यक आहे अथवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे, असे वाटते, ज्याच्या स्वरुपाचे विवरण यासोबत जोडलेल्या अनुसूची दोन मध्ये दिलेले आहे, उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट-कलम (१) च्या तरतुदीन्वये याद्वारे असे अधिसूचीत करण्यात येते की, उक्त जमिनीची उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता भासण्याची शक्यता आहे.

आणि ज्याअर्थी, प्रस्तावित भूमि संपादनाच्या अनुषंगाने बाधित व्यक्तींचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे, यासोबत जोडलेल्या अनुसूची तीन मध्ये दिलेली आहे. ( विस्थापन होणार असेल या अनुसूची मध्ये कारणे नमूद करावीत.)

आणि ज्याअर्थी, सामाजिक परिणाम निर्धारण सारांश **महाराष्ट्र शासन असाधारण राजपत्र भाग चार अ** क्रमांक ३८ दिनांक - १३ मार्च २०१५ च्या अनुक्रमांक (क) अन्वये "संरक्षण सिध्दता " किंवा संरक्षण विषयक उत्पादन यासह भारताची राष्ट्रीय सुरक्षा व संरक्षण या दृष्टीने महत्त्वाचे असे प्रकल्प यांना भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई करण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ मधील सामाजिक प्रभाव निर्धारणाच्या तरतुदी लागू करण्यापासून सुट देण्यात आली आहे. ज्याबाबत विस्तृत विवरण अनुसूची चार मध्ये दिलेले आहे.

आणि ज्याअर्थी, कलम ४३ पोट-कलम (१) अन्वये पुनर्वसन व पुनर्वसाहत या प्रयोजनासाठी नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशील, यासोबत जोडलेल्या अनुसूची पाच मध्ये दिलेला आहे.

त्याअर्थी आता, असे घोषित करणेत येत आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम (११) पोट-कलम ४ नूसार कोणतीही व्यक्ती ही अधिसूचना प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून ते उक्त अधिनियमाच्या प्रकरण चार

खालील कार्यवाही पुर्ण होईल त्या कालावधीपर्यंत उक्त जमिनीचा अथवा तिच्या भागाचा कोणताही व्यवहार करणार नाही किंवा उक्त जमिनीवर कोणताही भार निर्माण करणार नाही.

परंतु, उक्त जमिनीच्या अथवा तिच्या भागाच्या मालकांने अर्ज केल्यावर, जिल्हाधिकाऱ्यांस विशेष परिस्थितीची कारणे लेखी नमुद करुन अशा मालकांस उपरोक्त तरतुदीच्या प्रवर्तनातून सुट देता येईल.

परंतु आणखी असे की, जर कोणत्याही व्यक्तीने या तरतुदीचे बुध्दीपरस्पर उल्लंघन केल्यामुळे तिला झालेल्या कोणत्याही हानीची किंवा क्षतीची जिल्हाधिकाऱ्याकडून भरपाई दिली जाणार नाही.

तसेच, उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट-कलम (५) अनुसार, जिल्हाधिकारी भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करतांना उचित भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क (महाराष्ट्र) नियम २०१४ ( यात यापुढे ज्याचा निर्देश " उक्त नियम " असा करण्यात आला आहे.) याच्या नियम १० च्या उपनियम (३) द्वारे विहीत केल्याप्रमाणे भूमी अभिलेखाच्या अद्यायावतीकरणाचे काम हाती घेणार असल्याचे व पुर्ण करणार असल्याचे देखील घोषित करण्यात येत आहे. आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (उ) अन्वये, समूचीत शासन असलेला जिल्हाधिकारी, उक्त अधिनियमाखालील जिल्हाधिकाऱ्यांची कार्य पार पाडण्यासाठी उपविभागीय अधिकारी, राजापूर यांस पदनिर्देशित करीत आहे.

## अनुसूची - एक

**जमिनीचे वर्णन** — मौजे- कुरंग लघु पाटबंधारे योजना सी . मुख्य कामे अंतर्गत धरण तळ, सांडवा, प्रवेश व पुच्छ कालवा विमोचक, बुडीत क्षेत्र व पोहोच रस्ता या प्रयोजनासाठी भूसंपादन.

**गावाचे नाव** — मौजे - कुरंग तालुका- लांजा, जि. रत्नागिरी.

| अनुक्रमांक | भूमापन क्रमांक किंवा गट नंबर/ सर्व्हे नंबर /हिस्सा नंबर | अंदाजित क्षेत्र (हेक्टरमध्ये) |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| १. | ५३१ पै | ०.१५.३५ |
| २. | ५३२ पै | ०.३६.४० |
| ३. | ५३३ पै | ०.१०.०० |
| ४. | ५३५ पै | ०.२९.५० |
| ५. | ५३४ पै | ०.९७.०० |
| ६. | ४५५ पै | ०.९१.०० |
| ७. | ४५४ | १.७१.०० |
| ८. | ४५२ पै | २.५५.६० |
| ९. | ४५१ पै | ०.५८.६० |
| १०. | ३९६ पै | ०.६१.०० |
| ११. | ३९७ | १.०१.०० |
| १२. | ३९८ पै | ०.१५.६५ |

| १ | २ | ३ |
|---|---|---|
| १३. | ३९९ पै | ०.१२.७० |
| १४. | ३९१ पै | ०.१८.०० |
| १५. | ३९३ पै | ०.४७.५० |
| १६. | ३९५ पै | ०.०४.०० |
| १७. | ३९४ पै | ०.३१.०० |
| १८. | ४८१ पै | २.७०.०० |
| १९. | ४८५ पै | ०.११.६० |
| २०. | ४८६ पै | १.१८.६० |
| २१. | ४८७ पै | ०.०१.५० |
| २२. | ४७९ | ०.४२.०० |
| २३. | ४८० पै | ०.२४.३० |
| २४ | ४७८ पै | ०.६६.३० |
| २५ | ४७७ पै | ०.३६.०० |
| २६ | ४७३ पै | ०.१६.०० |
| २७ | ४५८ | ०१.७८.०० |
| २८ | ४५७ | ०.७१.०० |
| २९ | ४५६ पै | २.६९.०० |
| ३० | ४५९ | ०.४०.०० |
| ३१ | ४६१ पै | १.१३.०० |
| ३२ | ३७९ पै | ०.०७.३५ |
| ३३ | ३७८ पै | ०.००.७५ |
| ३४ | ३७६ पै | ०.०५.६० |
| **एकूण** | | **२३.२६.३०** |
| **सरकारी क्षेत्र (वहाळ)** | | **१.१३.००** |
| **एकूण संपादन क्षेत्र** | | **२४.३९.३०** |

## अनुसूची — दोन

## सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरूपाबाबत विवरण

**प्रकल्पाचे नाव** - लघु पाटबंधारे योजना मौजे-कुरंग ता. लांजा, जि. रत्नागिरी

**प्रकल्पाच्या कार्याचे वर्णन** - लघु पाटबंधारे योजना सी . मुख्य कामे अंतर्गत धरण तळ, सांडवा, प्रवेश व पुच्छ कालवा विमोचक, बुडीत क्षेत्र व पोहोच रस्ता या प्रयोजनासाठी भूसंपादन.

**समाजाला मिळणारे लाभ** - या प्रकल्पामुळे १४० हेक्टर आर क्षेत्र सिंचनाखाली येणार आहे त्यामुळे कृषि उत्पादनामध्ये वाढ होऊन,मुबलक हिरवा चारा निर्माण होणार आहे. पशुपालन, दुग्ध, व्यवसाय, शेती, फळबाग लागवड होऊन गावामध्ये स्थानिकांना व सभोवतालच्या गावातील लोकांना रोजगार मिळवून त्यांच्या जीवनमानाचा दर्जा वाढणार आहे. रोजगारासाठी स्थलांतरित झालेली कुटंबे परत गावात येतील. पाणी साठ्यामुळे मत्स्यपालन, बोटिंग,मासेमारी इत्यादी मुळे पर्यटनात वाढ होईल.अशी शिफारसही भाकर सेवा संस्था कोंडगे, ता.लांजा यांनी केलेली आहे.

## अनुसूची तीन

## बाधीत व्यक्तीचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे

कुरंग लघु पाटबंधारे योजना लांजा जमिनीचे संपादन करण्यात येत आहे. तसेच बाधित क्षेत्रात निवासी जागेचा अंतर्भाव होत नाही म्हणून बाधीत कुटूंबाच्या विस्थापनाचा व पुर्नवसनाचा प्रश्न उद्भवत नाही.

## अनुसूची चार

## (सामाजिक प्रभाव निर्धारण अभ्यास करणाऱ्या अभिकरणाने दिलेली सामाजिक प्रभाव निर्धारणाचा सारांश)

सचिव, भाकर सेवा संस्था, लांजा यांजकडील क्रमांक-On:SIA/३५५/२०२५ दिनांक - १४/०२/२०२५ अन्वये दिलेल्या प्रमाणपत्रानुसार कुरंग लघु पाटबंधारे प्रकल्पाचे सोबत दिलेल्या नमुन्यात दिनांकित स्वाक्षरी घेऊन बजावणी भूसंपादन केल्याने सामाजिकदृष्टया कोणताही दुष्परिणाम आढळून येत नाही. सामाजिक परिणाम निर्धारण (SIA) पथकाने केलेल्या अभ्यासाअंती बहुतांश लोकांची संमती असल्याचे आढळून आले आहे, असे प्रमाणपत्र देण्यात आले आहे.

## अनुसूची पाच

भूसंपादनामुळे बाधित क्षेत्रात निवासी जागेचा समावेश नसल्याने बाधित होणारी कुटूंबे नाहीत, त्यामुळे पुनर्वसन व पुनर्वसाहतीचा प्रश्न उद्भवत नाही.

**टिप**:-उक्त जमिनीच्या नकाशाचे, उपविभागीय अधिकारी कार्यालय, राजापूर या कार्यालयात निरीक्षण करता येऊ शकेल.

राजापूर,
दिनांक १५ एप्रिल, २०२६.

**विश्वजित गाताडे,**
उपविभागिय अधिकारी राजापूर.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.